# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी




• कृषि माहिती वाहिनी : (०२४५२) २२९०००, मो. ८३२९४३२०९७, ई-मेल : deevnmkv@gmail.com, deemau@rediffmail.com • फोन : (०२४५२) २२८६०१
• विद्यापीठ संकेत स्थळ : www.vnmkv.ac.in विद्यापीठाच्या बातम्यांसाठी पहा www.promkvparbhani.blogspot.com /vnmkv /vnmkv /user/vnmkv


## ११ नोव्हेंबर — आश्विन/कार्तिक शके १९४८ — २०२६

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र<br>रविवार | आश्विन कृ. ७ शुभ दिवस<br>भानुसप्तमी<br>कालाष्टमी<br>**१** | आश्विन कृ. १४ <br>नरक चतुर्दशी<br>दर्श अमावस्या,<br>अभ्यंगस्नान<br>लक्ष्मीपूजन<br>सायं. ५.३२ ते रात्री ८.०६ पर्यंत<br>महावीर निर्वाण (जैन)<br>अमावास्या प्रारंभ<br>सकाळी ११.२७<br>**८** | कार्तिक शु. ६ शुभ दिवस<br>बिरसा मुंडा जयंती<br>**१५** | कार्तिक शु. १३<br>प्रदोष<br>भारतीय अग्रहायण मासारंभ<br>**२२** | कार्तिक कृ. ६ शुभ दिवस<br>**२९** |
| सो<br>सोमवार | आश्विन कृ. ८<br>औद्योगिक सुरक्षा दिन<br>**२** | आश्विन अमावास्या,<br>अभ्यंगस्नान<br>सोमवती अमावास्या<br>दुपारी १२.३१ पर्यंत<br>अमावास्या<br>समाप्ती<br>दुपारी १२.३१<br>**९** | कार्तिक शु. ७ शुभ दिवस<br>जलाराम जयंती<br>**१६** | कार्तिक शु. १४<br>वैकुंठ चतुर्दशी<br>पौर्णिमा प्रारंभ<br>रात्रौ ११.४२<br>**२३** | कार्तिक कृ. ७<br>**३०** |
| मं<br>मंगळवार | आश्विन कृ. ९<br>**३** | कार्तिक शु. १ अभ्यंगस्नान<br>बलिप्रतिपदा<br>दीपावली पाडवा<br>कार्तिक मासारंभ<br>महावीर जैन<br>संवत २५५३<br>**१०** | कार्तिक शु. ८ शुभ दिवस<br>दुर्गाष्टमी, गोपाष्टमी (सायं. ५.१६ नं.)<br>लाला लजपतराय पुण्यतिथी<br>**१७** | कार्तिक पौर्णिमा<br>तुलसीविवाह समाप्ती<br>गुरू नानक जयंती<br><br>पौर्णिमा समाप्ती<br>रात्रौ ०८.२३<br>**२४** |  |
| बु<br>बुधवार | आश्विन कृ. १०<br>**४** | कार्तिक शु. २<br>भाऊबीज<br>चंद्रदर्शन<br><br>**११** | कार्तिक शु. ९<br>**१८** | कार्तिक कृ. १ शुभ दिवस<br>**२५** | |
| गु<br>गुरूवार | आश्विन कृ. ११<br>रमा एकादशी<br>वसुबारस<br>गोवत्स द्वादशी<br>**५** | कार्तिक शु. ३<br>**१२** | कार्तिक शु. ९<br>**१९** | कार्तिक कृ. २ शुभ दिवस<br>संविधान दिन<br>**२६** | |
| शु<br>शुक्रवार | आश्विन कृ. १२<br>प्रदोष, गुरूद्वादशी<br>धनत्रयोदशी<br>धन्वंतरी जयंती<br>**६** | कार्तिक शु. ४<br>विनायक चतुर्थी<br>**१३** | कार्तिक शु. १०<br>प्रबोधिनी स्मार्त एकादशी<br>**२०** | कार्तिक कृ. ३<br>संकष्ट चतुर्थी<br>चंद्रोदय ०८.२०<br><br>**२७** | |
| श<br>शनिवार | आश्विन कृ. १३<br>शिवरात्री<br>**७** | कार्तिक शु. ५<br>पांडव पंचमी<br>पंडित नेहरू जयंती, बालदिन<br><br>**१४** | कार्तिक शु. ११/१२<br>भागवत एकादशी, पंढरपूर यात्रा<br>तुलसीविवाहारंभ<br>**२१** | कार्तिक कृ. ४/५<br>महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी<br>**२८** | |

............ १
............ २
............ ३
............ ४
............ ५
............ ६
............ ७
............ ८
............ ९
............ १०
............ ११
............ १२
............ १३
............ १४
............ १५
............ १६
............ १७
............ १८
............ १९
............ २०
............ २१
............ २२
............ २३
............ २४
............ २५
............ २६
............ २७
............ २८
............ २९
............ ३०

### या महिन्यातील करावयाची कामे


- खरीप ज्वारी व बाजरीची कापणी करून उतारास आड्वी नांगरट करावी.
- बागायती हरभऱ्यासाठी पेरणी १५ नोव्हेंबरपर्यंत करावी.
- बागायती गव्हाचे एचडी-२२७८, एचडी-२१८९ हे वाण २० नोव्हेंबर पर्यंत पेरावेत. उशीरा पेरावयाच्या गव्हासाठी एचडी-२३८०, एचडी-२१८९, कैलास व पीबीएन-५१ हे वाण पेरावेत.
- गव्हास पेरणीच्या वेळी शिफारस केलेले नत्र, स्फूरद व पालाश द्यावे. (१००:५०:५०कि./हे)
- हरभऱ्यावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५%, ४ ग्रा १० लिटर पाण्यातून फवारावे.
- बागायती हरभऱ्यास व करडईस पेरणीनंतर ४५ दिवसांनी पहिले पाणी द्यावे.
- सूर्यफुलास बोंडी लागते वेळी व फुलोऱ्यात असताना ३० दिवसांनी हेक्टरी ३० किलो नत्र द्यावे.
- पूर्वहंगामी उसाची लागवड या महिन्यात संपवावी.
- टोमॅटो, फुलकोबी, पानकोबी व कांदा या भाजी पाल्याच्या रोपांची पूर्नलागवड करावी.
- तुरीवरील घाटे अळी व शेंगमाशीच्या नियंत्रणासाठी ल्युफेन्युरॉन ५.४ ई.सी. २ मिली व डायमेथोएट ३० %, १३ मिली पाण्यातून फवारावे.



**पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकुर**
* स्थापना : सन २००९ * दूरध्वनी : (०२३८१) २५१०९३






पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकुर

### महत्त्वाच्या नोंदी

# रोगमुक्त पशुधनासाठी योग्य लसीकरण हीच गुरुकिल्ली

नोव्हेंबर २०२६

डॉ.गजेंद्र लोंढे
विभाग प्रमुख
मो. : ९४२१४४९४९७
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,वनामकृवी, परभणी.

जनावरांना आजार झाल्यास, अपु-र्या पशुवैद्यकीय सेवेमुळे, किंवा नक्की निदान न झाल्यामुळे जनावरे दगावतात व पशुपालकांना उत्पादन व औषधोपचारावरील खर्च यासाठी मोठ्या आर्थिक संकटाला समोर जावे लागते. त्यामुळे जनावरांना रोगांपासुन दुर ठेवण्यासाठी लसीकरण करणे आवश्यक ठरते. जनावरांना नियमीत लसीकरण केल्यास संसर्गजन्य रोगांचे प्रमाण कमी होऊन जास्तीत जास्त उत्पादन मिळु शकते. दुग्धव्यवसायात दुधाळ जनावरांना निरोगी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

**लसीकरण का करणे गरजेचे आहे ?**

१. लसीकरणामुळे संसर्गजन्य रोगांपासून जनावरांचे संरक्षण होते.
२. रोगांमुळे होणारे मृत्यू व उत्पादनातील आर्थिक नुकसान कमी होते.
३. दूध, मांस व अंड्यांचे उत्पादन वाढते.
४. जनावरांची रोगप्रतिकारक क्षमता वाढते.
५. गावात मोठे साथीचे रोग पसरु नयेत यासाठी लसीकरण अत्यंत आवश्यक आहे.

**लसीकरण करण्यापूर्वी –सर्वसाधारण प्राथमिक तपासणी**

१. पशू निरोगी असावेत – ताप, अतिशय अळसपण, अतिसार, उलट्या किंवा इतर आजाराची लक्षणे असल्यास लस देऊ नका; पशुवैद्यकाचा सल्ला घ्या.
२. गर्भार जनावर – गर्भवती जनावरांना खास काळजी घेणे आवश्यक; काही जिवंत लसी गर्भवतींना देऊ नयेत. डॉक्टरांशी चर्चा करा.
३. लसीकरणापूर्वी १०–१५ दिवस आधी कृमिनाशक देणे उपयुक्त असते (लसीचा प्रतिसाद सुधारतो).
४. जनावरांच्या अंगावरील गोचीड, पिसवा काढण्यासाठी योग्या औषधांचा वापर करावा.
५. ताजे आणि चांगले पोषण –लसीकरणापूर्वी हलके–पोषण व पाणी पुरवठा ठेवा; अतिदुर्बल प्राणी टाळा.
६. लसीकरण शक्यतो सकाळी करावे.
७. वया पेक्षा लहान जनावरांचे लसीकरण करु नये.
८. लस देण्याची पध्दत व मातरा उत्पादकांच्या माहिती पत्रात दिल्याप्रमाणे असावी.
९. आपल्या भागात वारंवार उद्भवणाया आजाराचे लसीकरण पशुवैद्यकाच्या सल्याने करावे, कारण काही विशिष्ट आजार काही विशिष्ट भागातच उद्भवतात.

**लसीसाठी शित साकळी हाताळताना :**

१. लसीचे साठवणुक करताना शित साखळीचे तापमान २–८ असावे. लस परवानगी पत्रावर दिलेल्या तापमानातच ठेवा उष्णते मुळे लस निष्क्रिय होते.
२. उघडलेली लस योग्य वेळेत वापरा पुनर्बांधणी करुन तयार करण्यात आलेली लस त्वरीत वापरावी.
३. वापरण्यापूर्वी लेबल वाचा लसीची मात्रा, लस देण्याचा मार्ग, टीकवण क्षमता, प्रतिबंधात्मकता व योग्य साठवण या बाबत माहिती दिली.
४. वेगवेगळ्या लस एकत्र ठेऊ नका.

**योग्य साधने व स्वच्छता :**

१.स्वच्छ, नवीन सुई व सिरिंज वापरा. एकाच सुईने अनेक जनावराना लस देऊ नये. त्यामुळे संसर्ग टाळता येतो.
२.लसीकरण करताना अंतरस्नायु व त्वचेखाली लस दिली जाते प्रत्येक प्रजातीमध्ये लसीकरणासाठी योग्य ठिकाण व कोन वापरा.



३.लसीकरण देण्याची जागा अल्कोहोल स्वॅब किंवा पाण्याने स्वच्छ करून घ्या.
४.वातावरण स्वच्छ ठेवा – लसीकरण करताना गोठा स्वच्छ व शांत असावा.

**जनावरांचे प्रमुख रोग व त्यांची लक्षणे :**

**गाय व म्हैस यांच्यातील प्रमुख रोग व लक्षणे :** गाय व म्हैस या प्रजातीमध्ये अनेक रोगांच्या प्रादुर्भव होतो त्यामध्ये प्रामुख्याने खालील रोगांचे गांभीर्य मोठे आहे.



**१.तोंडखुर (BQ) :** तोंड, जीभ आणि ओठांवर पाण्यासारखे फोड तयार होऊन ते फुटतात, त्यामुळे लाळ जास्त प्रमाणात गळते. खुरांवर खोल जखमा होतात आणि प्राणी सहज उठू–चालू शकत नाही. भूक कमी होते आणि ताप वाढतो. दूध उत्पादन ५०–७०% पर्यंत अचानक घटू शकते. रोग अतिशय संसर्गजन्य असल्याने कळपात वेगाने पसरतो.

**२. घटसर्प (HS) :** अचानक तीव्र ताप येतो, श्वास घेणे कठीण होते आणि मान व घशाभोवती मोठी सूज दिसते. प्राणी सुस्त पडतो, तोंडातून फेस येऊ शकतो आणि हालचाल कमी होते. रक्तदूषित अवस्था निर्माण झाल्याने रोग झपाट्याने गंभीर होतो. अनेक वेळा काही तासांतच मृत्यू होऊ शकतो. पावसाळ्यात हा रोग प्रामुख्याने वाढतो.



**३.काळा रोग (BQ) :** पायांच्या स्नायूंमध्ये गरम, वेदनादायक सूज निर्माण होते आणि प्राणी उभा राहण्यास टाळाटाळ करतो. शरीराचा तापमान वाढतो, भूक कमी होते आणि प्राणी वारंवार झोपायला पाहतो. सूजलेल्या भागातून दाबल्यास आवाज येतो, हे काळ्या रोगाचे विशेष लक्षण मानले जाते. उपचार उशिरा केल्यास काही तासांतही मृत्यू होऊ शकतो. दूषित जमिनीवर चरताना संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते.

**४.लम्पी स्किन रोग :** लम्पी स्किन रोग हा देवी या रोगाच्या गटातील विषाणूमुळे होणारा एक अत्यंत संसर्गजन्य त्वचारोग आहे. हा रोग प्रामुख्याने गायी व कधी कधी म्हशींमध्ये दिसतो. देशभरात गेल्या काही वर्षांत मोठा उद्रेक झाल्यामुळे पशुपालकांसाठी हा अत्यंत महत्त्वाचा विषय ठरला आहे. जनावरांच्या शरीराच्या कोणत्याही भागावर १ ते ७ सें.मी. आकाराच्या कठीण, गोल गाठी तयार होतात. गाठी दाबल्यास वेदना होऊ शकतात आणि काही वेळा त्या खोल जखमांमध्ये रूपांतरित होतात. ताप येतो, भूक कमी होते, सुस्ती वाढते आणि दूध उत्पादन झपाट्याने घटते. डोळ्यातून पाणी, नाकातून स्राव आणि त्वचेवर खपल्या दिसतात. गंभीर अवस्थेत प्राणी खूप कमजोर होतो. यासाठी सर्वात परिणामकारक उपाय म्हणजे लसीकरण होय. LCD लस ही लम्पी स्किन रोगासाठी मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. शेडमध्ये कीटकनियंत्रण, गोठ्यांची स्वच्छता, बाधित प्राणीवेगळे ठेवणे आणि जखमांची स्वच्छ देखभाल आवश्यक आहे. चारापाणी दूषित होऊ नये म्हणून प्राणी गर्दी टाळावी. लम्पी स्किन रोग म्हणजे शरीरावर गाठी निर्माण करणारा, कीटकांद्वारे पसरणारा धोकादायक विषाणूजन्य रोग. दूध, वजन आणि आरोग्यावर मोठा परिणाम होतो. लसीकरण, स्वच्छता व कीटक नियंत्रण हे तीन उपाय मिळून या रोगाला थांबवू शकतात. हा रोग एकदा फार्ममध्ये आला की शिस्तबद्ध व्यवस्थापनच नुकसान कमी करण्याचा मार्ग ठरतो.



**५. अँथ्रॅक्स :** अँथ्रॅक्स हा Bacillus anthracis या जिवाणूमुळे होणारा तीव्र, प्राणघातक आणि अत्यंत संसर्गजन्य रोग आहे. या जिवाणूचे बीजाणू जमिनीत अनेक वर्षे जिवंत राहू शकतात, त्यामुळे एकदा क्षेत्रात रोग दिसला की पुन्हा पुन्हा उद्रेक होण्याची शक्यता असते. अचानक जोरदार ताप येतो, प्राणी सुस्त पडतो आणि भूक कमी होते. शरीरात सूज (विशेषत: मान, गळा, पोटाखाली) दिसते. प्राणी सहसा काही तासांत किंवा एका दिवशी कोसळतो. तोंड, नाक, गुदद्वार आदी छिद्रांतून काळसर रक्तस्त्राव दिसणे ही त्याची विशेष खूण असून रक्त लवकर गोठत नाही. हा रोग मानवांनाही होऊ शकतो. या रोगाचा उपचार लवकरात लवकर करणे आवश्यक असते. त्यामुळे प्रतिबंध –विशेषत: वार्षिक लसीकरण आणि योग्य मृत प्राणी व्यवस्थापन–हा एकमेव सुरक्षित मार्ग ठरतो.



**६.ब्रुसेलोसिस :** ब्रुसेलोसिस हा Brucella abortus या जिवाणूमुळे होणारा एक संथ पण गंभीर संसर्ग आहे. हा रोग प्रामुख्याने गर्भाशय, प्रजनन अवयव आणि दूध प्रणालीवर परिणाम करतो. विशेष बाब म्हणजे ब्रुसेलोसिस हा मानवांनाही होणारा (Zoonotic) रोग आहे, त्यामुळे पशुपालकांनी अधिक काळजी घ्यावी. गर्भार गाय–म्हशींमध्ये ६–८ महिन्यात अचानक गर्भपात हे त्याचे प्रमुख लक्षण आहे. काही प्राण्यांमध्ये अपत्य मृत जन्माला येणे किंवा पुढील गर्भधारणा न होणे दिसते. दुधात घट येते, उरोजात हलकी सूज व ताप जाणवू शकतो. नर जनावरांमध्ये अंडकोष सुजणे सामान्य आहे. ब्रुसेलोसिससाठी उपचार प्रभावी नसल्याने प्रतिबंधच सर्वात महत्त्वाचा आहे. ४–८ महिन्यांच्या वासरांना एस१९ लसीकरण करणे अत्यावश्यक आहे. गर्भपात झालेल्या ठिकाणाची पूर्णनिर्जंतुक सफाई करावी. संक्रमित प्राण्यांना कळपापासून वेगळे ठेवावे. कच्चे दूध पिऊ नये आणि हाताळणी करताना हातमोजे, बूट यांचा वापर करावा.



**शेळी व मेंढी मधील प्रमुख रोग व लक्षणे :** शेळ्या, मेंढ्यान मध्ये जीवाणुजन्य व विषाणुजन्य रोगांचा प्रादुर्भव मोठ्या प्रमाणावर आढळतो. यापैकी काही महत्वाचे रोग खालील प्रमाणे आहेत.

**१.शेळी प्लेग (पीपीआर) :** उच्च ताप, नाक व डोळ्यातून पाणी किंवा पूसारखा स्त्राव आणि तोंडात फोड किंवा जखमा दिसतात. तीव्र अतिसारामुळे शरीरातील पाणी कमी होऊन प्राणी खूप कमजोर होतो. खोकला व श्वसनाचा त्रासही जाणवतो. पिल्लांमध्ये मृत्यूदर अतिशय जास्त असतो. रोग जलद पसरत असल्याने संपूर्ण कळप धोक्यात येऊ शकतो.

**२.अंत्रविशार (एन्टेरोटॉक्सिमिया) :** हा आजार अचानक दिसून येतो आणि अनेकदा निरोगी प्राणीही काही तासांत मरु शकतो. प्राणी पोट पकडतो, लोळतो, अस्वस्थतेने इकडे–तिकडे धावतो किंवा शांत पडतो. अतिसार, पोटात गडगड आवाज आणि अचानक कोसळणे दिसते. जास्त पोषक आहार अचानक दिल्यास हा रोग वाढण्याची शक्यता जास्त असते. वेगाने प्रगती होणारा रोग असल्याने उपचाराला मर्यादित वेळ मिळतो.



**३.गोट–पॉक्स :** त्वचेवर गोल गाठी, पुरळ व खपल्या तयार होतात आणि ताप येतो. प्राणी कमी खातो, वाढ मंदावते आणि पिल्लांमध्ये त्रास जास्त दिसतो. कधीकधी डोळे व नाका भोवती जखमा दिसतात ज्यामुळे दिसणे व खाणे अवघड होते. आजार पसरायला थोडा वेळ लागतो पण एकदा पसरल्यास संपूर्ण कळपाला धोका असतो. उपचार मुख्यतः लक्षणांनुसार केले जातात.

**कुक्कुटांमधील प्रमुख रोग व लक्षणे**



**१. राणीखेत (Newcastle Disease) :** पक्ष्यांची मान एकीकडे वाकडी होऊन ते संतुलन गमावतात. श्वास घेण्यास त्रास, पाणावलेले डोळे आणि सुस्ती दिसते. पंख सैल लटकतात आणि पक्षी हालचाल कमी करतो. अंडी देणाया कोंबड्यांमध्ये उत्पादन झपाट्याने घटते. रोग अत्यंत संसर्गजन्य असल्याने संपूर्ण झुंड काही दिवसांत बाधित होऊ शकते.

**२.गंबोरो (IBD) :** पिल्लांना पाणीदार जुलाब होतात आणि भूक कमी होते. पोटाखालचा भाग ओला राहताना दिसतो आणि पिल्ले सुस्त व कमजोर पडतात. रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्याने इतर आजार सहज होतात. रोग ३–६ आठवड्यांच्या पिल्लांमध्ये जास्त दिसतो. झुंडीत प्रसार अतिशय वेगाने होतो.



**३.कुक्कुट देवी (Fowl Pox) :** पिसांवर, त्वचेवर गाठी, खपल्या किंवा पुरळ दिसतात. काही वेळा तोंडाच्या आत जखमा झाल्यामुळे खाणे–पिणे कमी होते. अंडी उत्पादन घटते आणि आजार बरा होण्यासाठी जास्त वेळ लागतो. रोग हळूहळू पसरतो पण झुंडीवर दीर्घकालीन परिणाम करतो. डास हा प्रमुख वाहक असल्याने पावसाळ्यात प्रसार वाढतो.



**४.मेरेक्स रोग :** मेरेक्स रोग हा Herpesvirus कुटुंबातील विषाणूमुळे होणारा एक अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. हा रोग विशेषतः कोंबड्यांमध्ये आढळतो आणि मुख्यत: मज्जातंतू, डोळे आणि अंतर्गत अवयवांवर परिणाम करतो. रोगाची वैशिष्ट्ये थोडी गुंतागुंतीची असतात, पण त्याच्यातील नसा वरील सूज, ट्यूमर तयार होणे आणि पॅरलिसिस त्याची ओळख ठरते. काही पक्ष्यांचे पाय एकीकडे वाकतात किंवा मागचा पाय पुढे होऊन शरीराचा तोल बिघडतो. चालण्यात अडचण येते किंवा पूर्ण पॅरलिसिस होऊ शकतो. डोळे धूसर होत जातात, बुबुळाचा रंग बदलतो आणि ग्रे आय दिसू शकतो. वजन कमी होते, भूक घटते आणि वाढ थांबते. अंतर्गत अवयवांवर (यकृत, प्लीहा, किडनी) ट्यूमर तयार होऊ शकतात. उपचार नाही–फक्त वेळेवर लसीकरण आणि कठोर जैव सुरक्षा हाच बचावाचा मार्ग.

| रोग | लस | डोस | पहिले वय | मार्ग | बूस्टर | योग्य महिने |
|---|---|---|---|---|---|---|
| तोंडखुर(FMD) | FMDलस | २ मि.ली. | ४ महिने | त्वचेखाली | ६ महिन्यांनी | मार्च–एप्रिल/ सप्टें.–ऑक्टो. |
| घटसर्प (HS) | HSलस | २ मि.ली. | ६ महिने | त्वचेखाली | दरवर्षी | मे–जून |
| काळा रोग(BQ) | BQलस | २ मि.ली. | ६ महिने | त्वचेखाली | दरवर्षी | मे–जून |
| अँथ्रॅक्स | अँथ्रॅक्सलस | १ मि.ली. | ६ महिने | त्वचेखाली | दरवर्षी | मे–जून |
| संसर्गजन्य गर्भ–पात(ब्रुसेलोसिस) | S19/ RB51 | २ मि.ली. | ४/८ म. | त्वचेखाली | एकच वेळ | कधीही |
| लंपी स्किन रोग (LSD) | LSD लस | २ मि.ली. | सर्व वय | त्वचेखाली | मोहिमे– | उद्रेक काळ –नुसार |

**कुक्कुट (चिकन) लसीकरण वेळापत्रक**

| रोग | लस | डोस | वय | मार्ग | बूस्टर |
|---|---|---|---|---|---|
| मारेक्स | मारेक्सलस | ०.२मि.ली. | दिवस १ | अंतस्नायु | अंडी उबवणी केंद्रावर |
| राणीखेत | लासोटा | १ थेंब | ५/७ दिवस | डोळ्यात | संपूर्णवर्ष |
| गंबोरो | IBDलस | लेबल प्रमाणे | १०/१४दि. | पाण्यात | संपूर्ण वर्ष |
| गंबोरो | IBDबूस्टर | लेबल प्रमाणे | १८/२१दि. | पाण्यात | संपूर्णवर्ष |
| देवी | फाउल पॉक्स | ०.०१मि.ली. | १२–१६हप्ते | विंगस्टॅब | पावसाळ्याआधी |
| राणीखेत | ND बूस्टर | लेबल प्रमाणे | १६–१८हप्ते | पाण्यात | अंडीसुरूहोण्याआधी |

**सारांश:** जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी आणि भंयकर रोगापासुन वाचविण्यासाठी वरील प्रमाणे लसीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. लसीकरणामुळे जनावर तर निरोगी राहते परंतु त्यामुळे शेतकयांना व पुशपालकांना त्यामुळे अर्थिक फायदा होऊन शेतकयांचे जिवणमान उंचवण्यास मदत होते.

* * * * *